# एकविसाव्या शतकातील महानगरीय जीवन आणि मराठी कविता

**प्रा.डॉ.हिरालाल सोमा पाटील**
*सहयोगी प्राध्यापक, विभागप्रमुख*
*वसंतराव नाईक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय*
*शहादा, जि. नंदुरबार*

आज जगाने भौतिकशास्त्र विकासात नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. मानवाला अशक्य असे काही नाही असा सार्थ अभिमान बाळगता येईल. एवढी कामगिरी एकविसाव्या शतकात आधुनिक तंत्रविज्ञानाने करून दाखविली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्ञानाच्या विस्फोट झालेला आहे. परंतु आज 21 व्या शतकात जगात कोरोनाच्या रूपात जगापुढे वैश्विक महामारीचे भयंकर संकट उभी केले आहे. या महामारीपेक्षा ही महानगरातील जीवन भयावह आहे. भारत हा खेड्यांचा बनलेला देश आहे .असे जरी म्हटले जात असले तरी खेड्याचा विकास झाला नाही. ग्रामीण भागात अनेक समस्या असल्यामुळे खेड्यातील लोक आता महानगराकडे धाव घेऊ लागले. त्यामुळे खेडे ओस पडली आणि महानगरातील लोकसंख्या भरमसाठ वाढली आणि त्यामुळे अनेक अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे आज 21व्या शतकात जात,धर्म, प्रांतनिहाय ग्लोबल संस्कृती आज उदयाला येतांना दिसत आहे .त्याचप्रमाणे 21 व्या शतकात तंत्रज्ञानाचा, माहितीचा,नवनवीन जाणिवांचा उद्रेक होण्याचा हा काळ जगण्यावर चाल करून येतो आहे. असे वाटते या आधीची "सारे कसे गोड गोड"अशी कविता मागे सारली जात आहे.त्यामुळे फॅन्टसी, रोमॅंटीसिझम, कल्पनारम्यपेक्षा आता वास्तवाधिष्ठित काव्यनिर्मिती होतांना दिसू लागली आहे. गेल्या दशकापासून वेगाने बदललेल्या जीवनशैलीचे परिणाम आता साहित्यातून दिसून येत आहे. कवितेची रचनात्मकशैली बदलली तशी महानगरीय मराठी कवितेची मांडणीही बदलेली दिसते .महानगरीय जीवनाचे चित्रण करत असताना कवीला आता छंद,मात्रा,वृत्तांची बंधने अधिकची नकोशी वाटू लागली आहेत."पुर्वीची आत्ममग्न कविता आता जीवनातल्या नवनव्या विषयांना भिडूलागली आहे. कविता आता नव्या रुपात अवतरली जीवनातल्या रुक्ष अनुभवांनी कविता कोरडी होत गेली. कविता कधी निराश वाटली कधी आशेची सूर घेऊन आली. तशा अनेक नवनवीन समस्याही मांडत गेली. या सर्वांपैकीच एक कविता होय ती म्हणजे महानगरीय जाणिवेची, संदर्भाची, प्रतिमांची,जगण्याची जी जाणीव शहरी वा महानगरीय जीवनाची त्यातील गुंतागुंतीशी आणि समस्येची निगडित तयार होऊ लागली आहे. ती म्हणजे महानगरी कविता होय. 21 व्या शतकातील महानगरीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या कविताच्या परामर्श या शोधनिबंधात थोडक्यात मांडलेला आहे.

**एकविसाव्या शतकातील महानगरी जीवनाचे काव्यात उमटले प्रतिबिंब :-**

21व्या शतकातील कवितेला महानगरीय शतकातील कवितेला महानगरी घडामोडीचा संदर्भ आहे. माणसाच्या भाव-भावना, संवेदना-विचार, जीवनविषयक जाणिवा, दृष्टी, नातेसंबंध आदी बाबीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. हे सर्व बदल आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे घडले आहेत. हे बदलते भावविश्व कवी सुनील अवचर यशवंत मनोहर, संजीव खांडेकर, उत्तम कांबळे, अशोक कोतवाल, अरुण काळे, महेंद्र भवरे संतोष पवार, भुजंग मेश्राम, प्रज्ञा लोखंडे, अशोक इंगळे आदी कवींच्या कवितांमधून प्रकर्षाने प्रकटलेले आहे.

माहिती आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. जगाशी संपर्क साधणे सहज शक्य झाले आहे. मात्र माणूस माणसापासून दूर जातो आहे. मानवी संवेदना बोथट झाल्या असून मानवी संस्कृतीचे बाजारीकरण होत आहे. त्यामुळे मानवाचे भावविश्व बदलून गेले आहे. हे महानगरीय बदलते भावविश्व सुनील अवचारांनी आपल्या कवितेत अचूक टिपले आहे ते म्हणतात.

*'या ग्लोबल वर्तमानात भावना झाली आहे जाहिरात*
*आणि मेंदूचे झाले आहे कॅम्प्युटर,*
*तत्वज्ञान झाले आहे युज अँड थ्रो*
*संस्कृती झाली आहे रखेल'*[1]

महानगरीय जाणीव बदलामुळे 21व्या शतकात मानवी भावनेला किंमत राहिलेली नाही. मानवी मेंदू कॅम्प्यूटरप्रमाणे वागतांना दिसतो. त्यामुळे माणसाचे आजचे तत्वज्ञान 'युज ॲन्ड थ्रो' वाटू लागले आहेत. या तत्वज्ञानामुळे माणसाच्या संस्कृतीची जागा विकृतीने घेतली आहे. जणूकाही ही संस्कृती बहुराष्ट्रीय कंपन्यांची रखेल झाल्याचे निदर्शनास येते. वरील कवितेप्रमाणे 'बी.पी. एल चा गहू देत नाही जगू अन देत नाही मरू,' धाब्यावरच्या वेटरची स्थिती नाही बेटर ! 'ब्रँड ॲम्बेसिडर', 'ती मला भेटली' हम नही है पर एक free इत्यादी कवितांमधूनही कवी सुनील अवचारांनी महानगरीय जीवनाचे चित्रण अत्यंत प्रत्ययकारी पद्धतीने चितारलेले आहे.

21व्या शतकात महानगरी जीवनाचे प्रतिबिंब अशोक कोतवाल यांच्या 'भरवसा वाहून चाललय,' 'काय करू 'एका शिक्षकाची कैफियत वगैरे कवितातून महानगरीय जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. त्यांच्या 'काय करू 'या कवितेतून ढासळती मूल्यव्यवस्था व तिचे प्रखर वास्तव प्रकट झालेला आहे. ते म्हणतात –

*'या शहरात*
*कोणत्याही बंद घराच्या*
*दारावरची बेल वाजवताना*
*माझे हात उगाचच थरथरतात*
*त्याला मी काय करू ?*
*दार उघडून बाहेर आलेल्या*
*व्यक्तीचा चेहरा मला*
*वाळवंटात प्रखर उन्हानं*
*तडकलेल्या खडकासारखा दिसतो*
*त्याला मी काय करू'?*[2]

21व्या शतकात खेडयांचे महत्व व त्यांची मुल्यव्यवस्था नष्ट होत चालली असून महानगरकेंद्रीत मूल्यव्यवस्था जोर धरू पाहते आहे. वरील कवितेच्या ओळी मधून कवी अशोक कोतवाल यांनी महानगरीय जीवनपद्धतीचे वास्तव चित्र रेखाटलेले आहे. हे लोक पाश्चात्य जीवनशैलीचे अंधानुकरण करीत असून व्यक्तिस्वातंत्र्य, एकांतप्रियता, समूहकेंद्री जीवना पेक्षा स्वकेंद्री जीवनपद्धती, विभक्त कुटुंब पद्धती, चंगळवाद ही पाश्चात्य मूल्य स्वीकारीत आहेत. त्यामुळेच मग त्यांना पुर्वसूचना न देता घरी आलेला पाहुणा नकोसा वाटू लागला. दार उघडून त्याचे स्वागतच नापसंतीदर्शक चेहऱ्याने केले जाऊ लागले. त्याला अलिप्तपणाने वागविण्यात येऊ लागले. तो केव्हा परत जाईल याची घाई झाली. ही सर्व मूल्यांच्या ऱ्हासाची वास्तवचित्रे या कवितेच्या माध्यमातून कवी अशोक कोतवाल यांनी रेखाटली आहेत.

'एका शिक्षकाची कैफीयत' कवितेतून अशोक कोतवाल यांनी महानगरी जीवनाचे विद्यार्थ्यांच्या जीवनावर होणारा परिणाम प्रत्ययकारी रितीने चित्रित केलेला आहे ते म्हणतात.

*'मुलं भटकतात शहरभर.......*
*पाहतात...... ऐकतात...... हाताळतात......*
*वाचतात ........टी.व्ही. कॅम्प्युटर*
*कॅलक्युलेटर ,डेली पेपर..'*[3]

या ओळींमधून कवी अशोक कोतवाल यांनी महानगरी विद्यार्थ्यांचे आधुनिक काळातील भावविश्व रेखाटले आहे. हे महानगरीय विद्यार्थी टी.व्ही. कॉम्प्युटरवर नवे जग पाहतात. जे त्यांना शाळेच्या चार भिंतीच्या बंदिस्त चाकोरीबद्ध वातावरणात पाहायला मिळत नाही. टी.व्ही.डेली पेपर वर मिडियाचे हे नवे जग त्यांना व्यापून टाकते. एकूणच 21व्या शतकातील महानगरीय विद्यार्थ्यांवर या आधुनिक उपकरणांच्या माध्यमातून पडतांना दिसून येतो. कवीचे सूक्ष्म निरीक्षण महानगरीय जीवन जगणाऱ्या विद्यार्थ्यांचा संदर्भात दिसून येते.

21व्या शतकात एका शिक्षकाची कैफियत महानगरातील माणसाचे जीवन बाजारीकरण परागंदा करणारा एकाएकी अंग झाडून इथल्या शहरातील उजेड या कवितेत उत्तम कांबळे 'जागतिकीकरणात माझी कविता'या काव्यसंग्रहात वर्णन करतात. श्रमाबरोबर सारा माणूसच विकत घेवू पाहणारा या जगाचे चित्र यातून चित्रीत होते. मध्यमवर्गीय श्रीमंत वर्गाकडे 'ग्राहक' या दृष्टीने त्याचे कसे आर्थिक शोषण करता येईल? याचाच अधिक विचार केला जात आहे .मॉल संस्कृतीने तर अक्षरशः गरज नसतांना सुद्धा ग्राहक मॉलमध्ये खरेदी करतो.आणि स्वतःचे दिवाळे काढतो. आणि मग कर्जबाजारी होऊन संघर्षाचे आयुष्य व्यथीत करतो. तसेच पाश्चात्य संस्कृतीने झालेली 'डे संस्कृती' हे सुद्धा भावनांचे विकृतीकरण आहे. भावनेतील ओलावा-

जिव्हाळा नष्ट होऊन त्याचेही बाजारीकरण जागतिकीकरणातील कवितेत 21व्या शतकातील महानगरीय जीवन व्यक्त झाले आहे. फादर डे, मम्मी डे, रोज डे आणि व्हॅलेंटाईन डे च्या नावाने हजारो कोटीची उलाढाल बाजारात होते. महानगरातील प्रत्येक सण-उत्सवांचे सादरीकरण हे फक्त बाजारीकरणाशी संबंधित असते. यातून फक्त आर्थिक शोषणाचे चित्रण जागतिकीकरणाच्या नावाखाली अधिक गडद होत चालले महानगरातील मानवाचे कसे अवमूल्यन झाले यांचे वास्तव चित्रण उत्तम कांबळे यांनी 'जागतिकीकरणात माझी कविता ' या कवितेत केली आहे.[4]

महानगरीय रस्ते चार पदरी होत असले तरी माणूस एक पदरी झाल्याची खंत अरुण काळे यांनी 'नंतर आलेले लोक आणि' ग्लोबलचं गावकूस ' या कविता संग्रहातून 21व्या शतकात निर्माण केलेल्या आरिष्टांना त्यांची कविता प्रखरतेने भिडताना दिसते. दलित, शोषित वंचिताच्या 21व्या शतकात झालेली वाताहत हा त्यांच्या कवितेच्या आस्थेचा विषय आहे. 21व्या शतकात महानगरीय जीवन गरीब लोकांचे जीवन भयावह होऊन गेले आहे. 21व्या शतकात सामान्य माणसाचे झालेले अगतिकीकरण अत्यंत अस्वस्थेचे चित्रीत करतांना दिसतात. त्या म्हणतात

*'हवा पाणी राहिले नाही सर्वांचे, रस्ते वाटा राहिल्या*
*नाहीत सर्वांच्या, जगाचे ग्लोबल गाव केलयं ना,*
*तर प्रेमाच होऊ द्या ना बाबा जागतिकीकरण'*[5]

21व्या शतकात महानगरीय जीवनाची झालेली वाताहात माणसाची माणसांची एकात्मताच हिरावून घेतलेली भयानक वास्तविकता अरुण काळे यांनी अधोरेखित केलेले आहे.

कवी महेंद्र भवरे यांना 21व्या शतकात महानगरीय जीवनात घडून आलेले प्रचंड सामाजिक बदल आणि महानगरीय जीवन जाणीवेची घुसमट आपल्या कवितेतून व्यक्त करतात. महानगरीय वास्तवामुळे मानवी जीवनात होणाऱ्या बदलांचा आणि त्यातील वेगवेगळ्या आवस्थांचा वेध भवरेंची कविता घेते. महानगरातला माणूस व्यक्तिकेंद्रित बनला त्यामुळे त्यांची नजर फायबर ग्लासकडून सायबर जगाकडे वळलेली दिसते. इथे माणसाकडे ग्राहक म्हणून बघितले जाते. मानवी मूल्यांचे अवमूल्यन घडत असल्यामुळे या युगाला ते ' पत्थरदिल युग ' संबोधतात. 21व्या शतकात महानगरातील लोकांच्या वाट्याला झोपडपट्टी, फुटपाथवरचे बकाल जीवन आले यामध्ये स्त्रियांच्या वाट्याला दुःख यातना आलेले आहेत. त्यांचे विदारक चित्रण दर्शवितांना उत्तम कांबळे म्हणतात-

*"माणसांच्या पिलांना*
*झोळीत टांगलेले*
*फुटपाथवरच*
*आतड्यांचा भाता करून*
*तीन दगडांची चूल*
*फू फू करून फुकणारी*
*एक माय*
*चुलीतला सगळा धूर*
*स्वतःच्या काळजात*
*साठवत होती*
*भाकरी स्पष्ट दिसावी म्हणून "*[6]

जीवन मरणाच्या प्रश्नांमध्ये स्त्रीची ससेहोलपट होत असतांना भांडवल प्रक्रियेने तिला उपभोगाचे साधन म्हणून समोर आणले आहे.

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून ही महानगरीय जीवनाचे चित्रण आले आहे. महानगरीय माणसाच्या गर्दीत माणूसकी सापडणे कठीण झाले आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवी जीवन कृत्रिम बनले असून शहरी मुलांना बालपणापासूनच आई-वडिलांच्या नातेवाईकांच्या प्रेमाला मुकावे लागते.कारण महानगरीय जीवन जगणाऱ्या मध्यमवर्गीय, कामगार, पोटासाठी दोघांना सकाळी नोकराच्या,कामाच्या निमित्ताने आई वडील घराबाहेर असतात. त्यांच्या सांभाळ करण्यासाठी पैसे देऊन 'आया' लावलेल्या असतात. अशावेळी ही मुलं घरात असलेल्या खेळण्यास सोबत खेळत असतात. कम्प्युटरवर खेळत राहतात आणि कम्प्युटरच्या आधीन होऊन जातात. म्हणून लहानपणापासून त्यांची संवेदना बोथट होत असते. याचे बोलके चित्रण 'खेळ' या कवितेतून केली आहे. त्या म्हणतात

*"बंद खोलीत कम्प्युटरवर*
*खेळताहेत*
*एक-एकटी मुलं*
*आख्येच्या आख्यं जग त्यांच्या पुढ्यात*

*एकावर एक वेष्टनांची*
*चलत लावून उभं*
*त्यांच्यासाठी आतंड तिळतिळ तुटण्याची*
*वेळच आता संपून गेलीय"*[7]

महानगरीय जीवनात लहान मुलांचे बालपण हरवून गेलं आहे यांचे विदारक चित्रण प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून व्यक्त होताना दिसते.

**सारांश :-**

21 व्या शतकातील महानगरी जीवनाचे चित्रण मराठी कवितेत माणसाला जाणवणारे बदलत्या महानगराचे स्वरूप महानगरातील एकाकीपण, महानगराची वेदना, तेथील बोथट संवेदना, स्वार्थीवृत्ती, व्यक्तिकेंद्रित, कृत्रिमता, यांत्रिकता, संवादशून्यता, भावशून्यता, संस्कृतीचे बाजारीकरण, विकृतीकरण तसेच 21व्या शतकातील सर्वच क्षेत्रात प्रचंड झालेली बदलांचे प्रतिबिंब महानगरी कवितेतून व्यक्त झालेले आहे.

**संदर्भग्रंथसूची :-**


१. *डॉ.सुनिल अवचार 'ग्लोबल वर्तमानाच्या कविता' दत्ता प्रकाशन अमरावती पृ.9*
२. *डॉ.शिरीष पाटील (संपादक) 'काव्यसुधा', प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथम आवृत्ती 2013 पृ.51*
३. *काव्यसुधा– संपा.डॉ.शिरीष पाटील ,प्रशांत पब्लिकेशन जळगाव 2013 पृ.क्रं.42*
४. *उत्तम कांबळे 'जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न' सुगावा प्रकाशन, पुणे, 2002 पृ.15.*
५. *महेंद्र भवरे, बंडखोर फकीर, नवाक्षर दर्शन- अरुण काळे विशेषांक, एप्रिल –सप्टें 2008 पृ.28*
६. *उत्तम कांबळे संपादक- 'जागतिकीरणात मराठी कविता', परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई प्र.आ. 2009 पृ.क्र.34,35*
७. *डॉ. मा. मा. जाधव (संपादक) 'अक्षरधारा' ऑक्टोबर 2011 मधील डॉ.अशोक इंगळे यांचा लेख पृ.43*